राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, मुलुंड येथील निवासी इमारत टाईप-२, बिल्डींग नं.०७ च्या विशेष दुरुस्तीकरीताच्या एकूण रुपये २२२.१४ लक्ष इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत....

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## शासन निर्णय क्रमांकः राकायो-२०१८/प्र.क्र.२४६/राकावि-२

नविन मंत्रालय, गोकूळदास तेजपाल रुग्णालय, संकूल इमारत
१० वा मजला, मंत्रालय, मुंबई.
दिनांक : २५ मे, २०१८.

**वाचा -**

१) शासन निर्णय वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दिनांक.१७.०४.२०१५
२) आयुक्त, राज्य कामगार विमा योजना यांचे पत्र क्र.आयुक्त/राकावियो/का.क्र.०९/ Mulund/७५९२-९३/२०१८, दिनांक ०९.०५.२०१८

**प्रस्तावना -**

राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, मुलुंड येथील निवासी इमारत टाईप-२, बिल्डींग नं.०७ च्या विशेष दुरुस्तीकरीताच्या एकूण रुपये २२२.१४/- लक्ष इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

## शासन निर्णय-

राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, मुलुंड येथील निवासी इमारत टाईप-२, बिल्डींग नं.०७ च्या विशेष दुरुस्तीकरीताच्या एकूण रुपये २२२.१४/- लक्ष इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक सन २०१७-१८ च्या दरसूचीवर आधारीत आहे. सदर अंदाजपत्रकास खालील अटीं व शर्तीच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती-**

१) सदर अंदाजपत्रकाचा खर्च उपलब्ध निधीतून भागवावा.
२) सदर अंदाजपत्र उपभोक्ता विभागाच्या सक्षम प्रधिकाऱ्याचे साक्षांकीत करावे.
३) कामासाठी निविदा मागविण्याआधी सदर कामास सार्वजनिक बांधकाम विभागातील सक्षम अधिकाऱ्यांची तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक राहील.

४) सदर कामाची वेगवेगळी निविदा न करता सर्व कामाची एकात्रित निविदा करण्यात यावी.

५) कामासाठीच्या जागेची उपलब्धता, योग्यता व जागा पुरेशी आहे किंवा नाही याबाबतची खात्री संबंधित आरोग्य संस्था प्रमुखांनी करावी.

६) क्षेत्रिय जागेच्या परिस्थितीनुसार व आरोग्य संस्थांच्या आवश्यकतेनुसार प्रस्तावित कामाची किंमत वाढणे शक्य असल्यामुळे त्यासाठी आवश्यक प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाच्या त्या-त्या भागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून करुन घ्यावेत.

७) सदरचे अंदाजपत्रक हे ढोबळ नमूना अंदाजपत्रक असल्याने, या कामांच्या सविस्तर अंदाजपत्रकांना तांत्रिक दृष्टया मान्यता ही सार्वजनिक बांधकाम खात्याच्या त्या-त्या क्षेत्राच्या सक्षम अधिकाऱ्यांकडून करण्यात यावे.

८) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य/उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञाकडून या कामाचे नकाशे व वस्तुमांडणी आराखडांना वेगळया मंजुरीची आवश्यकता नाही.

९) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्रमांक इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१, दिनांक १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/विनियम, दिनांक १७.०४.२०१५ सोबत परिशिष्ट, भाग पहिला, उपविभाग पाच मधील अनुक्रमांक १, परिच्छेद क्र.१३४ मधील नमूद केलेल्या अटींचे पालन करण्यात यावे.

३. सदर अंदाजपत्रकाच्या कामासाठी निधी उपलब्ध नसल्यास कामासाठी लागणाऱ्या रक्कमेची अर्थसंकल्पात तरतूद करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

४. हा खर्च खाली नमुद केलेल्या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाकरीता मंजूर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीतुन भागविण्यात यावा.

**मागणी क्र.आर-१**

**मुख्य लेखाशिर्ष -**

२२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

०१ - नागरी आरोग्य सेवा विषम चिकीत्सा

१०२ - राज्य कामगार विमा योजना

(०१)(०३) राज्य कामगार विमा योजना रुग्णालये

(२२१० १४०२) २७ - लहान बांधकामे.

५. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि.१७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग पाच मधील अ.क्र.१, नियम क्र.१३४ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२४१४४९५०३४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay R More

Digitally signed by Sanjay R More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7256abb8dd472637941e581488fb02eda9e0d6b701c434bcf471a0d525f80681, cn=Sanjay R More
Date: 2018.05.25 16:06:52 +05'30'

**संजय रा.मोरे**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, राज्य कामगार विमा योजना,मुंबई.
२. संचालक (वैद्यकीय) / (प्रशासन) राज्य कामगार विमा योजना, मुंबई .
३. वैद्यकीय अधिक्षक ,राज्य कामगार विमा योजना रुग्णालय , मुलूंड.
४. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
७. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई.
८. उप अभियंता, कुर्ला (सा.बां.), उपविभाग, कुर्ला (प.), मुंबई.
९. कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, अंधेरी, मुंबई.
१०. शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (नागरी), राकावियो रुग्णालय परिसर, मुलुंड (प), मुंबई.
११. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई.
१२. अवर सचिव, अर्थसंकल्प, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. निवड नस्ती (राकावि-२).